# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.11.2024** **वारःमंगळवार**

---

1. राज्यात निवडणूक प्रचार शिगेला; भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज पुण्यासह विविध ठिकाणी प्रचार सभा; कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांचाही आज राज्यात प्रचारदौरा,
2. मतदान जनजागृती प्रचाररथांचा विविध ठिकाणी प्रारंभ,
3. कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर इथं आज पहाटे विभागीय आयुक्तांच्या हस्ते विठ्ठलाची शासकीय महापूजा, आणि
4. महिलांच्या आशियाई अजिंक्यपद हॉकी स्पर्धेचं बिहारमध्ये उद्घाटन. भारताची विजयी सलामी.

**<u>प्रचार सत्ताधारी</u>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी अवघे काही दिवस राहिले आहेत; त्यामुळे विविध राजकीय पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. जाहीर सभा, प्रचार फेऱ्या, प्रचार करणाऱ्या वाहनांच्या फेऱ्या आणि उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची मतदारांची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठीची लगबग वाढली आहे.

पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज संध्याकाळी पुण्यात प्रचार सभा घेणार आहेत. तत्पूर्वी आज दुपारी चिमुर आणि नंतर सोलापूर इथंही मोदी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मुंबईत दोन सभांना संबोधित करतील. कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी हे देखील चिखली आणि गोंदिया मतदारसंघातल्या कॉंग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत.

शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल जालना जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. मराठवाडा आणि दुष्काळ हे दोन शब्द आपल्याला वेगळे करायचे असून, विकासाच्या माध्यमातून मराठवाड्याला न्याय द्यायचा आहे, असं शिंदे यावेळी म्हणाले.

कॉंग्रेससह महाविकास आघाडीचा जाहीरनामा फसवा असल्याची टीका भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर इथं केली. महायुतीच्या योजनांना विरोध करणारे महाविकास आघाडीतील नेते आपल्या जाहीरनाम्यात त्याच योजना नव्या नावाने राबवण्याचं आश्वासन देत आहेत, असं बावनकुळे माध्यमांशी बोलताना म्हणाले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची काल नंदूरबारमध्ये प्रचारसभा झाली. महायुती सरकारनं राज्यातल्या जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्याचं त्यांनी सांगितलं. आदिवासी शिक्षण, आरोग्य, पेसा, भरती यावर काम करून आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्याचा महायुतीचा प्रयत्न असल्याचं पवार म्हणाले.

महाराष्ट्राला देशातलं पहिल्या क्रमांकाचं विकसित राज्य बनवण्याचा भाजपचा संकल्प असून, राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचवण्यासाठी गतिमान विकास हे भाजपचं ध्येय आहे, असं भाजपाचे रत्नागिरी जिल्हाध्यक्ष राजेश सावंत यांनी सांगितलं. पत्रकार परिषदेत भजापाच्या संकल्पपत्राची माहिती देताना ते बोलत होते.

**प्रचार विरोधक**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी धुळे जिल्ह्यात प्रचारसभा घेतली. शेतकरी आत्महत्या, महिला सुरक्षा इत्यादी मुद्द्यांवरुन त्यांनी महायुती सरकारवर टीका केली. महायुतीच्या काळात राज्यामध्ये अंधार झाल्याची टीका करत हा अंधार दूर करण्यासाठी मी मशाल घेऊन आलो आहे, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे वाशीम इथल्या प्रचारसभेत म्हणाले. नागपूरमध्ये काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी जनआशीर्वाद यात्रा काढली. छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री काँग्रेस नेते भूपेश बघेल यांची गडचिरोली जिल्ह्यात कोरची इथं प्रचारसभा झाली. महायुती सरकार खोकेबाज आणि धोकेबाज लोकांचं आहे, अशी टीका त्यांनी केली. भाजपाला विधानसभा निवडणुकीत पराभव दिसू लागला आहे; त्यामुळेच जाती-धर्मात फूट पडणारे मुद्दे उपस्थित करून ते जनतेची दिशाभूल करत आहेत, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल यवतमाळ जिल्ह्यातल्या सभेत केली.

**प्रचार इतर**

राज्यातल्या युती, आघाडीत सामील नसलेल्या अन्य राजकीय पक्षांच्या प्रचारालाही वेग आला आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी वाशिम जिल्ह्यात प्रचार केला. यावेळी त्यांनी काँग्रेस, भाजपा यांच्यासह त्यांच्या मित्रपक्षांवर टीका केली. या पक्षांच्या नेत्यांनी सार्वजनिक ठिकाणी संविधानाच्या रंगावरुन वाद घालून सामान्य जनतेला फसवू नये, असं आंबेडकर म्हणाले.

**मतदान जनजागृती**

राज्यात पुढच्या आठवड्यात होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी स्वीप अंतर्गत केंद्रिय संचार ब्युरो आणि निवडणूक आयोगातर्फे मतदान जनजागृतीसाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. मतदान जनजागृती करणाऱ्या डिजिटल व्हॅनचा प्रारंभ काल राज्यातल्या विविध शहरांत करण्यात आला. पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नंदूरबार, अहिल्यानगर, पालघर, नागपूर, नांदेड इत्यादी ठिकाणी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मतदानाचे प्रचार रथ रवाना करण्यात आले. मतदानाची टक्केवारी कमी असणाऱ्या भागात नागरिकांना मतदानाचं महत्त्व पटवून देऊन मतदानाची टक्केवारी वाढवणं हे या उपक्रमाचं उद्दीष्ट आहे.

अहिल्यानगरमध्ये ग्रामीण विकास महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी, 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो', या पथनाट्याद्वारे जनजागृती केली. तर शनी शिंगणापूर इथं महाविद्यालयीन विद्यार्थी पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती करत आहेत. कोल्हापूरमध्ये शाहीर रंगराव पाटील यांच्या कलापथकानं पोवाडा सादर करुन मतदानाचं महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. सोलापूरमध्ये शाहीर रमेश खाडे यांच्या पथकानं गाण्यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती केली. नंदुरबारमध्ये मतदान जनजागृतीसाठी दुचाकी फेरी आयोजित करण्यात आली होती. लातूरमध्ये महिलांच्या मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रशासनानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात महिलांनी मतदानाचा संकल्प केला. पिंपरी चिंचवडमध्ये शहरातील विविध मॉल्समध्ये जनजागृती करण्यात आली.

**भाजपा तक्रार**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राज्यातल्या निवडणुकीबाबत अफवा पसरवण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार भाजपानं निवडणूक आयोगाकडे केली आहे. आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी राहुल गांधींवर कारवाई करावी अशी मागणी भाजपाच्या शिष्टमंडळानं निवडणूक आयोगाकडे केली.

**कार्तिकी एकादशी**

प्रबोधिनी एकादशी म्हणजेच कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर इथल्या मंदिरात श्री विठ्ठल रखुमाईची शासकीय पूजा पुण्याचे विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते आज पहाटे करण्यात आली. दरवर्षी कार्तिकी एकादशीला शासकीय महापूजा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते होते; पण यंदाची एकादशी निवडणूक आचारसंहितेच्या काळात येत असल्यामुळे

विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी सपत्नीक ही पूजा केली. यावेळी लातूर जिल्ह्यातल्या उदगीरचे बाबूराव सगर आणि त्यांच्या पत्नी सागरबाई यांना महापूजेचा मान मिळाला. सगर दाम्पत्य गेली 14 वर्ष पंढरीची वारी करत आहे. कार्तिकी एकादशी निमित्त पंढरपूरमध्ये तीन लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत.

**COP-29**

संयुक्त राष्ट्रांच्या एकोणतिसाव्या वार्षिक हवामान बदल परिषद म्हणजे कॉप-एकोणतीसला अझरबैजानमधील बाकु इथं कालपासून सुरुवात झाली. फायनान्स कॉप असं नाव दिलेल्या या दोन आठवड्यांच्या परिषदेत हवामान बदलाचा सर्वाधिक फटका बसणाऱ्या देशांसाठी वित्त पुरवठ्याचं नवं ध्येय निश्चित करण्यावर विशेष भर राहील. एक वृत्तांत...

**भारतासह 200 देशांचे वाटाघाटीकर्ते जागतिक तापमान वाढ रोखणं, हवामानाप्रती सहनशीलता बळकट करणं, आणि विकसनशील देशांसाठी देणारे हात हजारो करण्याबाबत वादविवाद करतील. भारत आणि दक्षिणेकडील देशांना हवामानविषयक उद्दिष्टं गाठण्यासाठी आणि हवामान बदलाचा फटका सर्वप्रथम बसणाऱ्या समुदायांचं रक्षण करण्याकरिता वित्त, तंत्रज्ञान आणि ऊर्जा स्रोतांची उपलब्धता हे महत्वाचे मुद्दे आहेत. हवामान बदलाचा प्रभाव कमी करणं आणि त्याच्याशी जुळवून घेण्याच्या प्रयत्नांसाठी आवश्यक तत्काळ आर्थिक पाठबळ देण्यातील समस्या दूर करण्याकरिता भारतानं आतापर्यंत महत्वाची भूमिका निभावली आहे. 2009 मध्ये यासाठी 100 अब्ज डॉलर्सचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं होतं. यावेळी बाकु परिषदेत भारत त्याहीपुढील नवीन एकत्रित संख्यात्मक ध्येयाकरिता बाजू मांडेल. वाटाघाटीकर्ते खऱ्या अर्थानं विकसनशील देशांच्या गरजा पूर्ण करणारं नवीन हवामान वित्त ध्येय मान्य करतील का यावर या परिषदेची फलश्रुती अवलंबून असेल. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

**सरन्यायाधीश**

देशाचे 51 वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी काल पदभार स्वीकारला. राष्ट्रपती भवनात झालेल्या विशेष सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी खन्ना यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या सोहळ्याला उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच अनेक केंद्रीय मंत्री आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उपस्थित होते.

**महिला-हॉकी**

महिलांच्या आशियाई अजिंक्यपद हॉकी स्पर्धेचं उद्घाटन काल बिहारमध्ये राजगीर इथं मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या हस्ते झालं. कालच्या आपल्या पहिल्या सामन्यात भारतीय महिला संघानं मलेशियावर 4-0 असा विजय मिळवला. दरम्यान, जपान आणि दक्षिण कोरिया यांच्यात झालेल्या उद्घाटनाच्या सामन्यात 2-2 अशी बरोबरी झाली. अन्य एका सामन्यात चीननं थायलंडच्या संघावर 15-0 असा दणदणीत विजय मिळवला.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.